# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक-05.05.2026** **वार- मंगळवार**

---

**मान्सूनपूर्व नियोजन**

पुणे महानगरपालिका हद्दीतील पाणीकपात रद्द करण्याचे निर्देश महापौर मंजुषा नागपुरे यांनी दिले आहेत. आगामी मान्सूनच्या पार्श्वभूमीवर पुणे महानगरपालिका हद्दीतील पाणीपुरवठा सुरळीत राहावा यासाठी आज महापौरांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक पार पडली. बैठकीत शहरातील विद्यमान पाणीसाठा, जलशुद्धीकरण व्यवस्था, वितरण प्रणाली तसंच संभाव्य पाणीटंचाईच्या उपाययोजनांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

तसंच,पुणे शहराला ज्या धरणसाखळीतून पाणीपुरवठा होतो, त्या, पानशेत, वरसगाव, टेमघर आणि खडकवासला या धरणांमधील साठ्याचा आढावा घेण्यात आला.

**पालखी सोहळा**

आगामी पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर शहरातील व्यवस्थापन सुरळीत पार पाडण्यासाठी प्रशासनानं सर्वंकष नियोजन करण्याच्या सूचना महापौर मंजुषा नागपुरे यांनी संबंधित विभागांना दिल्या आहेत. पालखी मार्गावरील संपूर्ण परिसर स्वच्छ ठेवणे, पिण्याच्या पाण्याची योग्य व्यवस्था करणे, तसेच ठिकठिकाणी स्वच्छतागृहे उभारणे आवश्यक असल्याचे निर्देश देण्यात आले आहेत. मुक्कामाच्या ठिकाणी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देत, आगमन आणि प्रस्थान मार्गावरील रस्त्यांची दुरुस्ती तातडीने पूर्ण करावी. तसंच वैद्यकीय तपासणी आणि आवश्यक सेवा केंद्रे उभारण्यात यावीत. तसेच, भाविकांच्या सोयीसाठी PMPML बससेवा उपलब्ध करून देण्याचेही निर्देश देण्यात आले आहेत.

**स्व-गणना**

देशाच्या १६ व्या जनगणनेला एक तारखे पासून सुरुवात झाली असून आज अखेर पुणे जिल्ह्यातील ६६ हजार १९३ नागरिकांनी स्व-गणना केली असल्याची माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिली आहे. स्व-गणना ही ऐच्छिक असून नागरिकांनी अधिकृत संकेत स्थळाचा वापर करुन १५ मे २०२६ पर्यंत स्व-गणना पूर्ण करायची आहे .सर्व नागरिकांनी आपल्या परिसरातील नागरिकांनाही अद्ययावत माहितीसह स्व-गणना करण्यास प्रोत्साहित कराव, असं आवाहन डुडी यांनी केले आहे.

**पुणे-आराखडा**

पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत समाविष्ट झालेल्या 23 गावांचा संरचनात्मक आराखडा करण्यासाठी तातडीने इरादा जाहीर करावा, अशा सूचना नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी पुणे महानगरपालिका प्रशासनाला दिल्या आहेत.

पुणे महानगर विकास प्रदेश प्राधिकरणाची 14 वी वार्षिक सर्वसाधारण सभा काल मुंबईत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीत, येरवडा ते कात्रज भुयारी मार्गासाठी स्वतंत्र विशेष उद्देश वहन संस्था निर्माण करावी अशा सूचना राज्यमंत्री मिसाळ यांनी केली होती. त्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मान्यता दिली आहे.

**शेती-ड्रोन**

अचूक शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी, खर्च कमी करण्यासाठी आणि शाश्वतता सुधारण्यासाठी ड्रोन हे एक क्रांतिकारक साधन म्हणून उदयास येत आहे. ड्रोनमुळे अचूक शेती, पीक निरीक्षण आणि कीटकनाशक फवारणी करणे शक्य होते, असं माजी सनदी अधिकारी शेखर गायकवाड यांनी म्हटलं आहे . राज्यव्यापी 'महा ड्रोन यात्रे'चा शुभारंभ गायकवाड यांच्या हस्ते आज हिरवा झेंडा दाखवून करण्यात आला, त्या वेळी ते बोलत होते.

**सफाई कर्मचारी**

सफाई कर्मचाऱ्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आण्याकरिता केंद्र आणि राज्यशासन मिळून काम करीत आहेत; त्यामुळे पुणे जिल्ह्यातही सफाई कर्मचाऱ्यांच्या पुर्नवसनाकरिता मॉडेल स्वरुपात दिशादर्शक काम करण्याचे निर्देश महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष शेरसिंग डागोर यांनी दिले आहेत. सफाई कर्मचाऱ्यांच्या समस्या आणि अडचणी निवारण करण्याकरिता केलेल्या उपाययोजनांबाबत आयोजित, आढावा बैठकीत ते बोलत होते.

**इआरपी प्रदर्शन**

महाराष्ट्राच्या औद्योगिक प्रगतीला डिजिटल युगाशी जोडण्याच्या उद्देशाने भारतातील पहिल्या 'ईआरपी' अर्थात एंटरप्राईज रिसोर्स प्लॅनिंग औद्योगिक प्रदर्शनाचं आयोजन, पिंपरी-चिंचवड इथंल्या ऑटोक्लस्टर एक्झिबिशन सेंटरमध्ये ७ ते ९ मे या कालावधीत करण्यात आले आहे. हे प्रदर्शन सकाळी १० ते सायंकाळी ६ वेळेत सर्वांसाठी विनामूल्य खुलं राहणार असून प्रदर्शनात देशभरातील १०० हून अधिक ईआरपी कंपन्या, तंत्रज्ञान पुरवठादार आणि स्टार्टअप्स सहभागी होत आहेत.

**निनाद बेडेकर स्मृती पुरस्कार**

ज्येष्ठ इतिहास संशोधक पांडुरंग बलकवडे यांना यावर्षीच्या निनाद बेडेकर स्मृती पुरस्काराने गौरवण्यात येणार आहे. निनाद बेडेकर यांच्या ११व्या पुण्यतिथीला, येत्या रविवारी १० मे रोजी पुण्यात, प्राच्यविद्या पंडित तसेच वाकाटक कालीन कला आणि स्थापत्य शास्त्राचे जाणकार अरविंद जामखेडकर यांच्या हस्ते पुरस्कार वितरण होणार आहे.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान ३८ अंश, तर किमान तापमान 23 अंश सेल्सियस नोंदवण्यात आलं. उद्या देखील याच प्रकारचं हवामान राहण्याचा अंदाज पुणे वेधशाळेने वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू, विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांत मध्ये, नमस्कार !**